# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### हातरुण (जि.अकोला) परिसरातील मोर्णा नदीच्या पुरामुळे बागायतदार शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याबाबत

**(१) २९८६० (१६-०१-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातरुण (जि.अकोला) परिसरातील मोर्णा नदीच्या पुराने शेतकऱ्यांचे व बागायतदार शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाने आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-१०-२०१८) :** (१) होय.

(२) शासन निर्णय दिनांक २०.०९.२०१६ अन्वये, अकोला जिल्ह्यात माहे जुलै ते ऑक्टोबर २०१५ या कालावधीत वादळी वारा, अवेळी पाऊस, अतिवृष्टी व पूर यामुळे झालेल्या शेतजमीनीच्या नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांना रु. ५९.०५ लक्ष रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी रु. २२,४८,९७५/- एवढा निधीचे वाटप करण्यात आले असून उर्वरित निधी शासनास समर्पित करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मंगळवेढा (जि.सोलापुर) या तालुक्याचा टंचाईग्रस्त यादीमध्ये समावेश करण्याबाबत

**(२) ४६९०६ (१५-०५-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापुर) या तालुक्याचा टंचाईग्रस्त यादीमध्ये समावेश करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी संबंधिंकाडे वारंवार मागणी करण्यात येऊनही अद्यापही याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंगळवेढा या तालुक्याच्या टंचाईग्रस्त यादीत समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१८) :** (१) शासन निर्णय दि.२७.४.२०१६ अन्वये सन २०१५-१६ च्या रब्बी हंगामात ५० पैसेपेक्षा कमी पैसेवारी आलेल्या मंगळवेढा तालुक्यातील ८१ गावांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे.

(२) सन २०१५-१६ च्या रब्बी हंगामातील अंतिम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या मंगळवेढा तालुक्यातील ८१ गावांमध्ये खालील उपाययोजना जाहीर करण्यात आल्या होत्या.

१) जमीन महसूलात सूट

२) सहकारी  पिक कर्जाचे पुनर्गठन

३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती

४) कृषी पंपाच्या चालू विजबिलात ३३.५% सूट

५) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी.

६) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर

७) दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर केलेल्या गावात शेतक-यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात स्कूल व्हॅन धोरण जाहिर करण्याबाबत

**(३) ४९१४२ (१५-०५-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जाहिर करण्यात आलेल्या स्कूल बस धोरणाच्या धर्तीवर स्कूल व्हॅन धोरण ठरविण्यासाठी शासनाने समिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अहवालाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, सदरहू अहवालातील शिफारशीची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात  येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१५-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

स्कूल बस धोरणाच्या धर्तीवर स्कूल व्हॅन धोरण ठरविण्यासाठी शासनाने समिती गठीत केलेली नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यातील डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठाचे कुलगुरु यांना पदावरुन हटविण्याबाबत**

**(४) ५२२४३ (१५-०५-२०१७). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.रवि प्रकाश दाणी हे मागील साडेतीन वर्षापासून कार्यरत होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांना वर्षातून १८० दिवसा अमेरिकेत वास्तव करणे बंधनकारक आहे व विदेशी नागरिकाला कुलगुरुपदी सहा महिन्यांसाठी नेमण्याचे अधिकार केंद्र शासन व एक वर्ष राज्य शासनाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, असे असतानाही ते साडेतीन वर्ष कुलगुरुपदी असून त्यांनी अजूनपर्यंत मी भारतीय नागरीक होईल असे शपथपत्र सुध्दा दिलेले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी डॉ.दाणी यांना कृषी संशोधन परिषदेने कुलगुरु व कुलसचिव यांना नोटिस बजावून स्पष्टीकरणासाठी मुदत देवूनही अद्यापर्यंत दाणी यांनी कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नसल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने डॉ.दाणी यांना कुलगुरुपदावरुन हटविण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१८) :** (१) डॉ.रवि प्रकाश दाणी यांची डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोला येथे कुलगुरु या पदावर दिनांक १३/८/२०१२ च्या आदेशान्वये मा.राज्यपाल तथा कुलपती यांनी नियुक्ती केली होती.

(२) विद्यापीठ सेवेतील पदावरील नेमणूकीबाबत महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिनियम, १९९० मधील परिनियम-१३३ मध्ये तरतूदी विहित केलेल्या आहेत.

(३) भारताचा विदेशी नागरिक असल्याने कुलगुरु पदावरील नियुक्तीची पात्रता डॉ.दाणी पूर्ण करतात किंवा कसे याबाबत मा.राज्यपाल तथा कुलपती यांच्या कार्यालयाकडे तक्रार प्राप्त झाली होती.

(४) या प्रकरणी डॉ,दाणी यांनी मा.राज्यपाल तथा कुलपती यांच्या कार्यालयाकडे दिनांक ९/३/१६ च्या पत्रान्वये खुलासा सादर केला होता.

(५) या प्रकरणी विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई आणि महाधिवक्ता, महाराष्ट्र राज्य यांचेकडून अभिप्राय घेण्यात आले.

(६) मा.राज्यपाल तथा कुलपती यांच्या दिनांक २९/७/२०१७ च्या आदेशान्वये डॉ.दाणी यांची कुलगुरु, डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोला या पदावरील सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत.

(७) सदर प्रकरणी शासन स्तरावरुन आणि मा.राज्यपाल तथा कुलपती यांच्या कार्यालयाकडून कार्यवाही सुरु होती. त्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

---

**दुष्काळी भागातील बागायतदार शेतक-यांना मदत देण्याबाबत**

**(५) ५४५२४ (१५-०५-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दुष्काळी भागातील बागायतदार शेतक-यांना मदत देण्याचा घेण्यात आलेल्या निर्णयात ज्या भागात सर्वाधिक बागायती असते अशा धरण लाभक्षेत्रातील जमिनीवरील बागायती पिकांनाच यातून वगळण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे राज्यातील पाटचा-या लाभक्षेत्रातील येणा-या दुष्काळी भागातील शेतकरी बागायती पिकांच्या मदतीपासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-११-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक ३१/१२/२०१५ ला अनुसरून महसूल व वन विभाग, पत्र क्र.एससीवाय-२०१५/प्र.क्र.३१५/म-७, दिनांक २२ मार्च, २०१६ अन्वये धरणाखालील लाभक्षेत्रातील लाभार्थ्यांना/ शेतकऱ्यांना दुष्काळाची मदत अभिप्रेत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा, जळगांव व औरंगाबाद जिल्हयातील शेतकऱ्यांनी केलेली आत्महत्या**

**(६) ५५३५४ (१५-०५-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांगरखेड (जि.बुलढाणा) येथील श्री.उत्तक श्रीरंग पिंपळे, गोंडखेल (ता.जामनेर, जि.जळगांव) येथील श्री.काशिनाथ कडू वाघ व तलवाडा (ता.वैजापूर, जि.औरंगाबाद) येथील श्री.दिगंबर कारभारी मगर या शेतकऱ्यांनी सततची नापिकी कर्जबाजारीपणा, वीज वितरण

कंपनीचा जाच आणि खासगी सावकाराच्या छळाला कंटाळून आत्महत्या केली असल्याची महिती दिनांक १९ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती उक्त शेतक-यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच आत्महत्या रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१८) :** (१) बुलढाणा जिल्ह्यातील पांगरखेड येथील उत्तम श्रीरंग पिंपळे यांनी दिनांक १९/०४/२०१६ रोजी कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केली आहे.

जळगांव जिल्ह्यातील जामनेर तालुक्यातील मयत काशिनाथ कडू कोळी, रा.गोंडखेड, ता.जामनेर यांनी दिनांक १९/०४/२०१६ रोजी गळफास घेऊन आत्महत्या केलेली असून मयताचे नावे शेती अगर कोणतेही बँकेचे अगर पतसंस्थेचे कर्ज नसल्याकारणाने शासन निर्णय दिनांक २३ जानेवारी, २००६ अन्वये कर्जबाजारीपणा, नापिकी व कर्जबाजारीपणाचा तगादा या तीन निकषात मोडत नसल्याने प्रकरण अपात्र ठरविण्यात आलेले आहे.

औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील तलवाडा येथील दिगंबर कारभारी मगर या शेतकऱ्याने सततची नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून दिनांक १८/०४/२०१६ रोजी आत्महत्या केली आहे. परंतु वीज वितरण कंपनीचा जाच आणि खासगी सावकाराच्या छळाला कंटाळून आत्महत्या केलेली दिसून येत नाही.
(२) होय.
(३) बुलढाणा जिल्ह्यातील पांगरखेड येथील उत्तम श्रीरंग पिंपळे व औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील तलवाडा येथील दिगंबर कारभारी मगर या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पात्र प्रकरणी त्यांच्या कुटुंबियांना रू.१ लक्षची मदत देण्यात आली आहे.

जळगांव जिल्ह्यातील जामनेर तालुक्यातील मयत काशिनाथ कडू कोळी यांचे नावे शेती अगर कोणतेही बँकेचे अगर पतसंस्थेचे कर्ज नसल्याकारणाने शासन निर्णय दिनांक २३ जानेवारी, २००६ अन्वये कर्जबाजारीपणा, नापिकी व कर्जबाजारीपणाचा तगादा या तीन निकषात मोडत नसल्याने प्रकरण अपात्र ठरविण्यात आले असल्याने मदत देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन अंतर्गत सर्व गरजू शेतकऱ्यांना अन्न सुरक्षा योजना व राजीव गांधी जीवनदायी योजनेचा लाभ देण्यात येत आहे. तसेच शेती विकासासंदर्भात सर्व विभागाकडील शासकीय योजना राज्यात राबविण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या वारसास रक्कम देतांना शासनाने जाचक अटी घतल्याबाबत**

**(७) ५८७६० (१६-०५-२०१७). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या वारसास शासन स्तरावरुन १ लाख रुपयांची मदत दिली जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रक्कम देतांना शासनाने काही जाचक अटी घालून उक्त निधीपैकी केवळ ३० हजार रुपये नगद देण्यात येत असुन उर्वरित ७० हजार रुपये बँक खात्यात ठेवीच्या स्वरुपात ठेवण्यात येते ती रक्कम सहा वर्षापर्यंत बॅक खात्यातून काढताच येत नसल्यामुळे आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या वारसाला केवळ ३० हजार रुपयांवर संकटाचे ओझे पेलावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त रक्कम देतांना जाचक अटी घालण्यामागची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त जाचक अटी तात्काळ काढून टाकण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१८) :** (१) होय.
(२) होय.

शासन निर्णय दि.२३ जानेवारी, २००६ नुसार जिल्हास्तरीय समितीमध्ये पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना रु.१ लक्ष सानुग्रह देण्यात येते. सदर मदत रु.३०,०००/- धनादेशाव्दारे व रु.७०,०००/- पोस्ट/बँकेच्या मासिक प्राप्ती योजनेमध्ये मृत शेतकऱ्याच्या वारसाच्या नावे जमा करण्यात येतात.

(३) दिनांक २६ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयानुसार मासिक प्राप्तीच्या योजनेमध्ये ठेवलेल्या रु.७० हजार रकमेच्या ५०% रक्कम वारसांना खालील तीन कारणांसाठी उपलब्ध करुन देण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

१. मुलांच्या शाळेची/महाविद्यालयाची फी भरण्यासाठी शाळेचा किंवा महाविद्यालयाचा फी प्रलंबित असल्याचा दाखला.

२. कुटुंबातील व्यक्तीच्या आजारपणासाठी लागणाऱ्या खर्चाबाबत शासकीय शल्यचिकित्सकाचा दाखला.

३. मुला-मुलींच्या लग्नाच्या खर्चासाठी रक्कम हवी असल्यास लग्न जुळलेनंतर सदर रक्कम त्याच प्रयोजनार्थ वापरण्यात येईल, याबाबतचे दोन साक्षीदारांच्या स्वाक्षरीसह स्टँपपेपरवर शपथपत्र.

(४) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना उर्वरित रु.७०/- हजाराच्या अर्धी रक्कम उपलब्ध करुन देण्याच्या हेतूने सदर अटी टाकण्यात आल्या आहेत. त्यामुळे सदर अटी काढून टाकण्याबाबतची कोणतीही बाब शासनाच्या विचाराधीन नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राजमाता विकास मच्छिमार सहकारी संस्था मर्या.,ससून डॉक या संस्थेने कोटयवधी रुपयांचा अपहार केल्याबाबत**

**(८) ७४५५२ (१३-०४-२०१७). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजमाता विकास मच्छिमार सहकारी संस्था मर्या.,ससून डॉक या संस्थेला एनसीडीसी योजनेतून दिनांक ३० मार्च २००९ रोजी वा त्यासुमारास ३ कोटी ४२ लाख रुपये बर्फ कारखाना व शितगृहे उभारण्याकरीता व सन २००६-०७ या काळात मासेमारी यांत्रिक नौकेकरीता ११ कोटी ८४ लाख रूपये निधी मिळाला होता, परंतु गेल्या ९-१० वर्षात या संस्थेने यांत्रिक बोटीचे वा शितगृहांची उभारणी न करता सदर १३-१४ कोटी रुपयांचा अपहार केल्याचे दिनांक १४ जुलै २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती दोषी अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (११-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे. आयुक्त मत्स्यव्यवसाय यांच्या दि. ३०.०३.२००९ रोजीच्या आदेशान्वये संस्थेच्या मासळी प्रक्रिया प्रकल्प, बर्फ कारखाना व शीतगृहासाठी रू. २३.०७ कोटी इतक्या प्रकल्प खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर प्रकल्प खर्चाच्या एकूण रकमेपैकी ९० टक्के रक्कम अर्थसहाय्य म्हणून मंजुर करण्यात आली असून त्यात रू. ३.४२ कोटी इतकी रक्कम ही बर्फ़ कारखाना व शीतगृह उभारणीसाठी वितरीत करण्यात आलेली आहे.

सन २००६-०७ व सन २००७-०८ मध्ये १५ गटांना १५ नौकांसाठी कर्ज मंजूर करण्यात आले असून त्यापैकी ५ नौकांचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. तर उर्वरीत १० गटांनी लाकडी नौके ऐवजी फायबर नौकाचे बांधकाम पूर्ण करून ६ महिन्यात नौका कार्यान्वित करण्यात येईल असे हमीपत्र दिले आहे.

संस्थेने सादर केलेल्या मासळी प्रक्रिया प्रकल्प, बर्फ कारखाना व शीतगृहासाठीच्या रू. ४६,७४,००,०००/- इतक्या प्रकल्प रकमेस एनसीडीसीने मान्यता दिलेली आहे. त्यापैकी संस्थेला सन २०१६-१७ व सन २०१७-१८ मध्ये रु.८,५४,५२,४००/- एवढा निधी मंजूर झाला असून रु.५,२०,००,०००/- एवढा निधी संस्थेला वितरीत करण्यात आलेला आहे. संस्थेने कामाची अपेक्षित प्रगती न राखल्याने उर्वरित रक्कम रु.३,३४,५२,४००/- रोखून ठेवण्यात आलेली आहे.

तसेच संस्थेकडे थकीत असलेली रक्कम व इतर वसूलपात्र रक्कमेच्या वसुलीसाठी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम १७६/१८४ अंतर्गत सक्तीच्या वसुलीची कार्यवाही चालू केलेली असून, या संस्थेच्या मालकीच्या जागेच्या ७/१२ उताऱ्यावर शासनाचा कर्ज/अर्थसहाय्याचा बोजा चढविलेला आहे.

(२) होय, याप्रकरणी आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांनी दि. ०८.०६.२०१६ रोजीच्या पत्रान्वये सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांना विभागीय चौकशीची कारवाई करण्यास कळविले आहे.

(३) सहकार अधिकारी श्रेणी-२ यांचेविरुद्ध विभागीय चौकशी सुरु आहे.

(४) कार्यवाही सुरु असल्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

---

**खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(९) ७८७१९ (१५-०४-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरीप हंगामात माहे जुलै ते ऑक्टोंबर, २०१६ या कालावधीमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या १६० गावातील एक हजार ९८९ शेतक-यांच्या २६३ हेक्टर क्षेत्रावरील शेती पिकांच्या नुकसानीचा अहवाल राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत शासनास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्हयातील तालुकानिहाय किती नुकसान झाले आहे,

(३) असल्यास, सदरहू अहवालाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, तदनुसार उक्त अहवालावर केव्हापर्यंत अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-१०-२०१८) :** (१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात माहे जुन ते ऑक्टोबर २०१६ या कालावधीमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे ११८९ शेतकऱ्यांच्या २६३.६०हेक्टर क्षेत्रावरील शेतीपिकाच्या झालेल्या नुकसानीबाबतचा अहवाल कृषी विभागामार्फत शासनास सादर करण्यात आला आहे.

(२) (३) व (४) सदर आपत्तीमुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यात २४ हेक्टर, वैभववाडी तालुक्यात १३.७० हेक्टर, सावंतवाडी तालुक्यात ४.९० हेक्टर, दोडामार्ग तालुक्यात ३६ हेक्टर व वेंगुर्ला तालुक्यातील १८५ हेक्टर शेतीपिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले.

त्याअनुषंगाने शासन निर्णय दिनांक १९.०७.२०१८ अन्वये सिंधुदुर्ग जिल्ह्यात माहे जुन ते ऑक्टोबर२०१६ या कालावधीमध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीसाठी रु. ५१.३१ लक्ष एवढा मदत निधी मंजूर करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राहता (जि.अहमदनगर) येथील शेतक-यांना पैसे देण्यास महाबीजकडून नकार दिल्याबाबत**

**(१०) ८६२६८ (१५-०८-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राहता (जि.अहमदनगर) येथील शेतक-यांच्या शेतात तूर बिजोत्पादन कार्यक्रम राबवून ठरलेल्या कराराप्रमाणे शेतक-यांना पैसे देण्यास महाबीजकडून नकार दिल्याचे दिनांक १५ जून,१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शेतक-यांनी मा. कृषी मंत्री यांच्याकडे तक्रार केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणातील फसवणूक झालेल्या शेतक-यांना कराराप्रमाणे पैसे देण्यात आले आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती संबंधित शेतक-यांची फसवणूक करणा-या महाबिजाविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कायआहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

अहमदनगर जिल्ह्यातील राहता तालुक्यात खरीप हंगाम २०१६ मध्ये राबविण्यात आलेल्या तूर बिजोत्पादन कार्यक्रमात २९ बिजोत्पादक शेतकऱ्यांकडून ४८.४० हेक्टर बिजोत्पादन क्षेत्रातून ७७२.९९ क्विंटल कच्चे बियाणे प्राप्त झाले होते. त्यापैकी महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणीकरण यंत्रणेच्या उगवन शक्ती चाचणीत ११ शेतकऱ्यांचे १६३.५० क्विंटल पायाभुत बियाणे पात्र ठरले. अहमदनगर जिल्ह्यासाठी ठरलेल्या अंतिम बियाणे खरेदी दरानुसार पात्र ठरलेल्या बियाणांची रक्कम अदा करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणीकरण यंत्रणेच्या उगवन शक्ती चाचणीत अपात्र ठरलेले बियाणे संबंधित शेतकऱ्यांना परत करण्यात येतात.

(२), (३) व (४) महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणीकरण यंत्रणेच्या उगवन शक्ती चाचणीत पात्र ठरलेल्या बियाणांना कराराप्रमाणे निर्धारीत खरेदी धोरणानुसार अंतिम बियाणे खरेदी दरानुसार रक्कम अदा करण्यात आलेली आहे. अपात्र बियाणे साठ्यास बिजोत्पादन नियमावली अनुसार रक्कम देता येत नाही. अपात्र ठरलेले बियाणे परत घेऊन जाण्याची सूचना देऊनही जे बिजोत्पादक शेतकरी सदर बियाणे नेत नाहीत, अशा बियाणांची ई निविदेद्वारे महाबीजकडून विक्री केली जाते व त्यानुसार प्राप्त रक्कम संबंधित बिजोत्पादक शेतकऱ्यांना देण्यात येते.

महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणीकरण यंत्रणेच्या उगवन शक्ती चाचणीत पात्र ठरलेल्या बियाणांची रक्कम संबंधित बिजोत्पादक शेतकऱ्यांना अदा करण्यात आल्यामुळे, महाबीजमार्फत कोणत्याही बिजोत्पादक शेतकऱ्याची फसवणूक झालेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अल्प भूधारक शेतकऱ्यांना मोफत बियाणे, किटकनाशके देण्याच्या निर्णयाबाबत

**(११) ८७७०४ (१५-०८-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उत्पादन खर्चास कमीत कमी ठेवता येईल आणि शेतक-यांचे कमीत कमी नुकसान होईल याद्दष्टीने छोटे शेतकरी, अल्पभूधारक यांना मोफत बियाणे,खते व किटकनाशके पुरविण्याचा निर्णय शासनाने दिनांक १५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-१०-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

कृषि विभागामार्फत शेती विकासाच्या, तसेच, शेतकरी कल्याणाच्या विविध योजना व कार्यक्रम राज्यात राबविण्यात येतात. सन २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. सदर उद्दिष्टपुर्तीसाठी दिनांक १३ एप्रिल, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०१७-१८ च्या खरीप व रब्बी हंगामात “उन्नत शेती-समृद्ध शेतकरी” मोहीम राबविण्यात येत आहे. कृषि विभागाच्या प्रचलित योजनांच्या अंमलबजावणीत अधिक सुटसुटीतपणा व सुसूत्रता आणून योजना पारदर्शकरीत्या व अधिक प्रभावीपणे राबविण्याचा शासनाचा उद्देश आहे. त्याचप्रमाणे “उन्नत शेती-समृद्ध शेतकरी” या मोहिमेद्वारे आधुनिक कृषि तंत्रज्ञान राज्यातील सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यात येत आहे.

---

### लिंगटी (ता.पांढरकवडा, जि.यवतमाळ) येथील शेतातील ज्वारी पिकाला आग लागल्याने ज्वारी पिकांचे नुकसान झाल्याबाबत.

**(१२) ८८६२६ (१५-०८-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लिंगटी (ता.पांढरकवडा, जि.यवतमाळ) येथील शेतकरी श्री.मयुर पुरुषोत्तम कु-हेवार याच्या शेतातील ज्वारी पिकाला दिनांक २१ एप्रिल,२०१७ रोजी वा त्यासुमारास अचानक आग लागल्याने त्यांचे अडीच एकर मधील ज्वारी पिकांचे नुकसान झाले असून याबाबत त्यांनी फिर्याद दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आगीची चौकशी करून पंचानामा करण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शेतक-याला नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-१०-२०१८) :** (१), (२) व (३) पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यातील लिंगटी येथील शेतकरी मयुर पुरुषोत्तम कुऱ्हेवार याच्या शेतातील ज्वारी पिकाला दिनांक २१ एप्रिल २०१७ रोजी आग लागल्याचे निदर्शनास आले. त्याबाबत पोलिस स्टेशन, पांढरकवडा येथे अज्ञात व्यक्तीविरुद्ध फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

शासन निर्णय दिनांक १३.०५.२०१५ मधील तरतूदींनुसार सदर बाब नैसर्गिक आपत्तीमध्ये येत नसल्याने आगीमुळे झालेल्या नुकसानीसाठी मदत देण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर जिल्हयात निकृष्ट दर्जाची बियाणे व खतांची विक्री होत असल्याबाबत

**(१३) ८९७३६ (१५-०८-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात निकृष्ट दर्जाची बियाणे व खतांची विक्री होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतच्या किती तक्रारीवर कृषी विभागाकडून कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) असल्यास, जिल्हयात निकृष्ट दर्जाची बियाणे व खतांची विक्रीवर वचक ठेवण्याकरीता शासनाने कोणत्या विशेष उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-१०-२०१८) :** (१), (२) व (३) कोल्हापूर जिल्हयात बोगस बियाणे व खतांच्या विक्रीवर वचक ठेवण्याकरीता प्रत्येक तालुकास्तरावर १ अशी १२ आणि जिल्हास्तरावर १ भरारी पथके स्थापन करण्यात आलेली आहेत. तसेच, जिल्हास्तरावर १, तीन उपविभागीय स्तरावर प्रत्येकी १ आणि १२ तालुकास्तरावर प्रत्येकी १, अशी एकूण १६ तक्रार निवारण कक्ष जिल्हयात कार्यरत आहेत.

जिल्हयातील गुणनियंत्रण निरीक्षकांकडून सन २०१६-१७ मध्ये बियाणे वितरकांच्या १४०४, खते वितरकांच्या १५३२ व खते उत्पादकांच्या ७५ तपासण्या करण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी, बियाणांचे ५ व खतांचे १०९ नमुने अप्रमाणित आढळून आलेले आहेत. बियाणे व खतांचे १७ आणि किटकनाशकांचे १० विक्री बंद आदेश वितरकांना लागू करण्यात आलेले आहेत. तसेच, ७ बियाणे विक्रेते, ३ खते विक्रेते व २ किटकनाशके विक्रेते यांचे परवाने निलंबित करण्यात आलेले आहेत.

अप्रमाणित ९ बियाणे नमुन्यांवर आणि अप्रमाणित ३२ खते नमुन्यांवर कोर्ट केसेस दाखल करण्यात आलेल्या आहेत. अप्रमाणित नमुन्यांच्या अनुषंगाने १० प्रकरणांमध्ये सुमारे ४५ टन साठा जप्त करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्हयातील सात भरारी पथकांबाबत

**(१४) ९१८६८ (१५-०८-२०१७). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषि विभागामार्फत अकोला जिल्हयातील सात तालुका स्तरावर भरारी पथकांना. बियाणे-खतांच्या विक्रीतील काळाबाजार रोखण्यासाठी दुकानांची तपासणी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भरारी पथकांनी अद्यापही तपासणी अहवाल दिलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती तपासणी अहवाल न देणा-या भरारी पथकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही,

अमरावती विभागातील अकोला जिल्ह्यात सात भरारी पथके गठीत करण्यात आलेली आहेत. सदर पथकांनी त्यांच्या तालुक्यातील कृषि निविष्ठा विक्री केंद्राच्या तपासण्या करून निविष्ठांचे नमुने काढलेले असुन यासंदर्भात प्रयोगशाळांचे तपासणी अहवाल प्राप्त झालेले आहेत. तपासणीत अप्रमाणित आढळून आलेल्या नमुन्यांवर कायद्यातील तरतूदीनुसार कारवाई करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना देण्यात येणारी आपत्ती निवारण निधीची (एनडीआरएफ) मदत बंद करण्यात आल्याबाबत

**(१५) ९२१५५ (१५-०८-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाद्वारे नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना शेतपिंकांच्या नुकसानी करीता देण्यात येणारी आपत्ती निवारण निधीची (एनडीआरएफ) मदत बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नुकसान प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या निकषाशी जोडल्यामुळे शेतकरी मदतीपासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यातील निकषात बदल करुन तात्काळ कार्यान्वित करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगणघाट तालुक्यातील पुरपिडीत कुटुंबियांना मालकी हक्काचे पट्टे अद्यापही न मिळाल्याबाबत.

**(१६) ९२४७१ (१५-०८-२०१७). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तालुक्यातील १९८० च्या महापुरामध्ये विस्थापित झालेल्या पुरपिडीत कुटुंबियांना मालकी हक्काचे पट्टे अद्यापही देण्यात आले नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुरपिडीतांना मालकी हक्काचे पट्टे न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, पुरपिडीतांना मालकी हक्काचे पट्टे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-१०-२०१८) :** (१) होय.
(२) हिंगणघाट तालुक्यातील मौजा पिंपळगाव मा. व मौजा नांदगाव बो. येथे पुरग्रस्त पुनर्वसन अभिन्यास तयार करून त्यामधील भुखंड पुरपिडीत कुटुंबियांना आवंटीत करून ताब्यात देण्यात आले आहेत. सदर पुरपिडीत कुटुंबांना वाटप करण्यात आलेल्या भुखंडाचा अभिलेख हा काही प्रमाणात जिर्ण झाला असून काही अस्तित्वात असलेल्या अभिलेखावरून मालकी हक्काबाबत पट्टे तयार करण्याचे काम सुरू आहे.
(३) मौजा घाटसावली,टेंभा,शेकापुर,वाई, धानोरा, हिवरा व फुकटा येथील पुरपिडीत कुटुंबियांना भुखंडाचा ताबा देण्यात आलेला आहे व जिल्हाधिकारी, वर्धा कडुन विशेष मोहिम राबवुन मालकी हक्काचे पट्टे तयार करण्यात आले असुन त्यांचे लवकरच वाटप करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोंदिया जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाने खाजगी कंपन्यांपेक्षा बियाणांच्या किंमतीत वाढ केल्याबाबत

**(१७) १०३६३६ (२७-१२-२०१७). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया जिल्ह्यातील ८ तालुक्यात महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाने (महाबीज) खाजगी कंपन्यांपेक्षा धानाच्या बियाणांच्या किंमतीत वाढ केल्याने याच धानाची खाजगी कंपन्यांकडून २० रु. किलो दराने विक्री केली जाते सदर शेतक-यांची शासनाकडून फसवणूक होत असल्याचे दिनांक ४ जून, २०१७ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चौकशीअंती शासनाने त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे व शेतक-यांना त्याचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.
गोंदिया जिल्ह्यात जिल्हा परिषदेमार्फत महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादीत (महाबीज), अकोला यांनी एम.टी.यु.१०१० या वाणाचा ७१४ क्विंटल पुरवठा केलेला आहे. तसेच, बियाणे विक्रेत्यांना ६१६० क्विंटल बियाणे पुरवठा केलेला आहे. गोंदिया जिल्ह्यात महाबीज, अकोला यांनी रू.७००/- प्रती बॅग (प्रती २५ किलो) या दराप्रमाणे विक्री केलेली आहे.

महाबीजच्या तुलनेत इतर खाजगी बियाणे कंपन्यांचे दर हे जास्त असल्याचे निदर्शनास आलेले आहे. तसेच, खरीप २०१७-१८ या हंगामात धान बियाणांची किंमत जास्त असल्याबाबतची तक्रार महाबीज अकोला यांच्याकडे प्राप्त झालेली नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व विशेष घटक योजना एकत्रित राबविण्यात आल्याबाबत**

**(१८) १०७३८६ (०१-०४-२०१८). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व विशेष घटक योजना या दोन योजना स्वतंत्रपणे न राबविता एकत्रित राबविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे पंचायत समिती निहाय लाभार्थी किती तसेच या योजनेच्या अटी व शर्थी काय होत्या,

(३) असल्यास, हातकणंगले पंचायत समितीमध्ये या योजनेचे केवळ तीनच लाभार्थी असल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, या योजनेच्या अंमलबजावणीसाठी कोल्हापूर जिल्हयाला निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे. अनुसूचित जाती उपयोजना (विशेष घटक योजना) अंतर्गत, अनूसूचित जाती/नवबौद्ध शेतकऱ्यांना शेतीसाठी अर्थसहाय्य देण्याची योजना दिर्घकालावधी पासुन राबविण्यात येत असल्याने योजनेचे पुर्नविलोकन करुन प्रचलित असलेली अनुसूचित जाती उपयोजना (विशेष घटक योजना) व मा. मंत्री (वित्त) यांनी घोषित केलेली डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना स्वतंत्रपणे न राबविता बदललेल्या परिस्थितीची गरज विचारात घेऊन प्रचलित विशेष घटक योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना या नावाने राज्यात राबविण्यास शासन निर्णय क्र. विघयो-२०१६/प्र.क्रं. १७६/४अे, दि. ५ जानेवारी, २०१७ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना कोल्हापूर जिल्ह्यामध्ये राबविण्यात येत आहे.

(२) पंचायात समिती लिहाय लाभार्थी

| पंचायत समिती | २०१६-१७ | २०१७-१८ | पंचायत समिती | २०१६-१७ | २०१७-१८ |
|---|---|---|---|---|---|
| शिरोळ | ३ | २२ | कागल | १ | २७ |
| गगनबावडा | १ | ३ | राधानगरी | ६ | ४ |
| आजरा | ३ | १३ | चंदगड | ६ | ९ |
| गडहिंग्लज | १ | २८ | हातकणंगले | ३ | ३३ |
| पन्हाळा | ४ | २४ | करवीर | - | १५ |
| शाहुवाडी | - | १८ | भुदरगड | - | १० |

योजनेच्या अटी व शर्ती-

१. लाभार्थी हा अनुसूचित जाती /नवबौद्ध शेतकरी असला पाहिजे.

२. शेतकऱ्याकडे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र असले पाहिजे

३. शेतकऱ्याचे नांवे जमीनधारणेचा ७/१२ दाखला व ८अ उतारा असणे आवश्यक आहे.

४. लाभार्थ्याकडे आधारकार्ड असणे आवश्यक आहे.

५. अनुदान वितरणासाठी लाभार्थ्याचे बँक खाते आधारकार्डशी संलग्न असणे आवश्यक आहे.

६. दारिद्र रेषेखालील लाभार्थ्यास प्राधान्य देणेत यावे.

७. दारिद्र रेषेखालील नसलेले अनु.जाती/नवबौद्ध शेतकऱ्यांचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न रु. १५००००/- पेक्षा जास्त नसेल तर या योजनेचा लाभ घेण्यास ते पात्र असतील.

८. विहीरीचा लाभ घेण्यासाठी कमीत कमी ०.४० हेक्टर क्षेत्र असणे आवश्यक आहे.

९. प्रस्तावित विहीर पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या विहीरीपासुन ५०० फुटापेक्षा जास्त अंतरावर असावी.

१०. लाभार्थीच्या ७/१२ वर तसेच प्रत्यक्षात विहीरी असल्यास त्याची योजनेसाठी निवड करता येणार नाही.

११. लाभ धारकाकडे तलाठी यांच्या स्वाक्षरीचा एकूण क्षेत्राचा दाखला आवश्यक.

१२. भुजल सव्हेक्षण विकास यंत्रणेकडुन पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र वरिष्ठ भू-वैज्ञानिक यांचेकडन आवश्यक.

१३. यापूर्वी राज्य शासन/केंद्र शासन, जिल्हा परिषदेच्या निधीतून सिंचन विहीर या सुविधेचा लाभ घेतलेला नसावा.

१४. इतर योजनेतुन घेतलेल्या व अर्धवट राहिलेल्या अपूर्ण विहीरीचे काम पूर्ण करण्यासाठी या योजनेचा लाभ घेता येणार नाही.

(३) होय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना २०१६-१७ अंतर्गत पं.स. हातकणंगले कडील एकुण १० लाभार्थ्यांच्या प्रस्तावांना जिल्हास्तरीय लाभार्थी निवड समितीने मान्यता दिली आहे व त्यापैकी तांत्रिक छाणनीअंती ३ लभार्थी पात्र झालेले आहेत.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आरे दुग्ध वसाहतीमधील झाडे नष्ट करण्यात येत असल्याबाबत**

**(१९) १०७४५० (०७-०४-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई आरे दुग्ध वसाहतीमधील झाडे नष्ट करण्यासाठी विषारी औषधाचा प्रयोग करुन झाडांना सुकवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप स्थानिकांनी केला असून याप्रकरणी स्थानिक पोलिस स्टेशन तक्रार करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरे कॉलनीतील जुन्या झाडांना धोका झाल्याने याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार दोषींवर कारवाई करण्यासह आरे वनराईचे सवंर्धन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (११-१०-२०१८) :** (१) होय,

(२) होय, आरे दुग्ध वसाहतीमधील शासकिय निवासस्थान क्र. एस.क्यू.-१ येथील जांभूळाच्या झाडाच्या खोडाला साधारणपणे २ ते ३ इंच लांब ४७ छिद्रे केल्याचे व तेथीलच पिंपळाच्या झाडाच्या खोडाला साधारणपणे २ ते ३ इंच लांब ३० छिद्रे केल्याचे निदर्शनास आले आहे. याशिवाय साधारणपणे ६ ते ७ फुट खोडांचा परिघ असलेले व अंदाजे ३० फुट उंच असलेल्या आंब्याच्या फळझाडास २० छिद्र केल्याचे दिसून आले आहे. तसेच सदर छिद्रांमध्ये रसायन सदृश्य पदार्थ टाकल्याचा प्रकार घडला असल्याचा संशय आहे.

(३) सदर प्रकरणी वनराई पोलीस ठाणे येथे दि.८/१/२०१८ रोजी अदखलपात्र गुन्हा क्र. ४४/२०१८ व दि. ८/३/२०१८ रोजी आरे पोलीस ठाणे येथे अदखलपात्र गुन्हा क्रमांक ३४४/२०१८ असे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. सदर प्रकरणी पुढील तपास पोलीस विभागामार्फत सुरु आहे.

आरे वनराईचे संवर्धन करण्यासाठी आरे वसाहतीत गस्त वाढवून वृक्षांचे व पर्यावरणाचे संरक्षण राखले जाईल याची खबरदारी घेण्यात आली आहे. तसेच, आरे दुग्धवसाहतीमधील सर्व परवानेधारकांना आरे दुग्ध वसाहत परिसरामधील वृक्षांना/पर्यावरणाला कोणत्याही परवानेधारकांकडून अनधिकृत कृत्य करून हानी पोहचवित असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित परवानेधारकांचा परवाना रद्द करण्याबाबत आरे प्रशासनाकडून लेखी कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर येथे राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्रामध्ये डाळिंबावर संशोधन करणेबाबत**

**(२०) १०७७७८ (०१-०४-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्रामध्ये डाळिंबापासून वाईन तयार करण्याचे संशोधन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डाळिंबापासून तेल तयार करण्याचाही उद्योग सुरु करण्यात येणार आहे व तो केव्हापासून सुरु करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती उक्त उद्योग सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-१०-२०१८) :** (१) होय.

सोलापूर येथील भारतीय कृषी संशोधन परिषद - राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्रामध्ये डाळींबापासून वाईन तयार करण्याचे संशोधन झाले आहे.

(२), (३) व (४) सदर संशोधन केंद्रामध्ये डाळिंबाच्या बियांपासून तेल काढण्याचे तंत्रज्ञान विकसित केले असून डाळिंबाच्या बियापासून तेल काढण्याचे केंद्र (युनिट) माहिती देण्यासाठी उपलब्ध केले आहे. तसेच हे तंत्रज्ञान उद्योजकांना हस्तांतरीत करण्यासाठी उपलब्ध केले आहे. असा नवीन उद्योग स्थापन करण्याचे राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्रामध्ये सध्यातरी नियोजन नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील जमिनीची प्रत सुधारण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(२१) १११४३९ (०१-०४-२०१८). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजन साळवी (राजापूर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निसर्गाचा बिघडलेला समतोल, वृक्षतोड, रासायनिक खते, रासायनिक किडनाशके व पाण्याचा अतिरेक वापर इत्यादी कारणांमुळे राज्यातील पिकाऊ जमिनींची सुपीकता ढासळत असल्याचे केलेल्या एका पहाणीत निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशातील ज्या राज्यांत जमिनींची प्रत खराब होण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे अशा राज्यात महाराष्ट्र तिस-या क्रमांकावर आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील जमिनीची प्रत सुधारण्यासाठी तातडीने उपाययोजना राबविण्यात यावी अशी मागणी या क्षेत्रातील जाणकारांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती राज्यातील जमिनीची प्रत सुधारण्यासाठी तातडीने उपाययोजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे. रासायनिक खतांचा असंतुलित व प्रमाणापेक्षा जास्त वापर, पाण्याचा अति वापर, सतत पिकाखाली असणारी जमिन त्याचबरोबर सेंद्रिय पदार्थांचा शिफारशीपेक्षा कमी होत असलेला वापर इ.बाबी शेतजमिनीच्या सुपिकता पातळीत व जमिनीचा कस कमी होण्याची प्रमुख कारणे आहेत.
(२) नाही.
(३) जमिनीचे आरोग्य अबाधीत राखण्यासाठी त्याच बरोबर जमिनीची प्रत सुधारण्यासाठी विविध योजना/ मृद संधारणाच्या माध्यमातून उपचार तसेच, शेतकऱ्यांना कृषि तज्ञांमार्फत मार्गदर्शन इ.माध्यमातून उपाययोजना सुचविल्या जातात व त्यासंबंधी योजना राबविल्या जातात.
(४) जमिनीची प्रत सुधारण्यासाठी, अन्नद्रव्याची कमतरता असलेल्या जमिनीत पिकांना संतुलित प्रमाणात व शिफारशीप्रमाणे अन्नद्रव्याचा पुरवठा करणे, तसेच, सेंद्रिय खतांचा शेतामध्ये नियमित वापर करणे, दरवर्षी पिकांची फेरपालट करणे, जमिनीच्या प्रकारानुसार पिके घेणे, माती परिक्षण अहवालानुसार पिकांना अन्नद्रव्याचा संतुलित प्रमाणात पुरवठा करणे व सिंचन करण्यापूर्वी पाण्याची प्रत तपासणे, इ.उपाययोजना करणेबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यात बोंडअळीच्या प्रादुर्भावाने पिकांचे झालेले नुकसान

**(२२) ११२०४८ (०१-०४-२०१८). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरखेड (जि.यवतमाळ) या मतदार संघातील कपासाच्या पिकावर बोंडअळी, सोयाबीनला आलेल्या अत्यल्प उत्पन्नामुळे मदत निधी मंजूर करण्याबाबत मा.कृषि मंत्री, यांना स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती उमरखेड (जि.यवतमाळ) या मतदार संघातील कपासाच्या पिकावर संपूर्ण बोंडअळी, सोयाबीनला आलेल्या अत्यल्प उत्पन्नामुळे मदत निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-१०-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) खरीप २०१७ च्या हंगामात झालेल्या बोंडअळीच्या प्रादुर्भावामुळे यवतमाळ जिल्हयातील उमरखेड तालुक्यात २३७०६.२० हेक्टर शेतीपिकांच्या क्षेत्राचे ३३ टक्क्यांच्या वर नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. त्याअनुषंगाने यवतमाळ जिल्हयातील उमरखेड तालुक्यात झालेल्या नुकसानीसाठी पहिल्या टप्प्यामध्ये रु. ४,१९,५७,४६३/- व दुसऱ्या टप्प्यामध्ये रु. ६,२९,३८,४५२/- एवढा मदतनिधी मंजूर करण्यात आला असून, मदत वाटपाची कार्यवाही तहसिलस्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हवेली (जि.पुणे) तालुक्यातील शेतकऱ्याच्या जमीनी लाभ क्षेत्रात येत नसल्याने त्यांच्या सातबाऱ्यावरील शेरे काढण्याबाबत**

**(२३) ११३१७३ (०१-०४-२०१८). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : तारांकित प्रश्न क्रमांक २८६९८ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामा आसखेड (ता.खेड, जि.पुणे) प्रकल्पातून पुणे आणि पिंपरी चिचवड शहरासाठी पाणी देण्याचे नियोजन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २० डिसेंबर २०१७ रोजी वा त्यासुमारास भामा आसखेड प्रकल्पग्रस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात ठिय्या मारुन निषेध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भामा आसखेड प्रकल्पासाठी हवेली तालुक्यातील अनेक जमीनीच्या सातबाऱ्यावर प्रकल्पसाठी राखीव असे शेरे ठेवले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती हवेली तालुक्यातील शेतकऱ्याच्या जमीनी लाभ क्षेत्रात येत नसल्याने त्यांच्या सातबाऱ्यावरील शेरे काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-१०-२०१८):** (१) भामा आसखेड धरणातून २.६८ टि.एम.सी. पाणी पुणे व २.१५ टि.एम.सी. पाणी पिंपरी चिंचवड शहरास मंजूर झाले आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) भामा आसखेड प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात हवेली तालुक्यातील जमिनीचा समावेश असल्याने तूर्तास ७/१२ च्या अधिकार अभिलेखातील राखीव शेरे कमी करता येत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य परिवहन महामंडळामध्ये आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांना नोकरी मिळण्याबाबत**

**(२४) ११६८९६ (३१-०७-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य परिवहन महामंडळामध्ये (ST) आत्मसमर्पण केलेल्या ६० नक्षलवाद्यांना वाहक म्हणून नोकरी दिली असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असुन अजुन काही आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांनी महामंडळामध्ये नोकरी मिळणेबाबत विचारणा केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, महामंडळामार्फत बिरसा मुंडा पुनर्वसन प्रकल्प योजना राबविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्य परिवहन महामंडळामध्ये आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांना नोकरी मिळणेसह बिरसा मुंडा प्रकल्पाअंतर्गत नक्षली क्षेत्रामधील कामाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०४-१०-२०१८) :** (१), (२) व (३) नक्षलपिडीत आत्मसमर्पित नक्षल सदस्यांना एकवेळची “विशेष बाब” म्हणून “बिरसा मुंडा पुनर्वसन प्रकल्प” असे नामकरण केलेल्या उमेदवारांना महामंडळाच्या सवेत वर्ग-३ व वर्ग-४ या घटकसंवर्गातील प्रवर्गामध्ये सामावून घेण्याबाबत महामंडळाने दि.१२.०१.२०१८ रोजी ठराव पारीत केलेला आहे. उक्त ठरावांन्वये एकूण ६८ नक्षलपिडीत व आत्मसमर्पित नक्षल सदस्यांपैकी २६ उमेदवारांना वाहक (क) या पदावर व ५ उमेदवारांना लिपिक-टंकलेखक (क) या पदावर नेमणूका देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयातील गोशाळेला मंजूर करण्यात आलेला निधी अदा करण्याबाबत**

**(२५) ११७२४७ (३१-०७-२०१८). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयातील लोटे-परशुराम एमआयडीसी येथे गोवर्धन गोवंश सेवा केंद्र या राज्यस्तरीय योजनेंतर्गत श्री संत ज्ञानेश्वर धाम सेवा संस्थान या संस्थेमार्फत गोशाळा सुरू करण्यात आली असून सदयस्थितीत ५०० हून अधिक अनाथ, भाकड व जखमी गोवंशाचे संगोपन केले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत शासनाकडून मंजूर झालेले अनुदान न मिळाल्याने संस्था आर्थिकदृष्टया अडचणीत आल्यामुळे गोवंषांना चारा-खादय पुरविला जात नाही तसेच निधीअभावी निवारा शेडचे बांधकाम अपूर्ण असल्याने सुमारे ३०० गाईंचे रस्त्यावर संगोपन केले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गोशाळेला मंजूर करण्यात आलेला निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (११-१०-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) व (३) सदर संस्थेकडून प्राप्त झालेले खर्चाचे अंदाजपत्रक व आराखडयास दिनांक ७.७.२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये अनुदान वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
त्यानुसार आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य यांच्या दिनांक ११.७.२०१८रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये मंजूर अनुदानाचा पहिला हप्ता रू.२५.०० लाख (रू.पंचवीस लाख) संस्थेच्या बँक खात्यावर थेट जमा करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मोंड (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) गावातील साईनगर येथील आंबा कलम बागेला आग लागून नुकसान झाल्याबाबत

**(२६) ११७३४१ (३१-०७-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोंड (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) गावातील साईनगर येथे आंब्यांच्या बागेला दिनांक ४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास आग लागून बागायतदारांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आग लागण्याची कारणे काय आहेत व आगीत नुकसान झालेल्या आंबा कलमांच्या नुकसानीचे पंचनामे तलाठी यांनी केले आहेत काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पंचानाम्याच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त बागायतदाराना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-१०-२०१८) : (**१) व (२) सिंधुदुर्ग जिल्हयातील देवगड तालुक्यातील मोंड गावातील एका आंब्याच्या बागेला दिनांक ०३ मे २०१८ रोजी आग लागल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार सदर आंब्याच्या बागेचा तलाठी मोंड यांनी पंचनामा केला असता आकस्मिकपणे आग लागल्याचे तसेच २५ आंब्याची कलमे जळून रु. ४,५०,०००/- चे नुकसान झाल्याचे दिसून आले.

(३) शासन निर्णय दिनांक १३.०५.२०१५ मधील तरतूदींनुसार आकस्मिकपणे आग लागल्याने शेती पिकांच्या झालेल्या नुकसानीसाठी कोणतीही मदत अनुज्ञेय नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वरळी डेअरीतील कर्मचाऱ्यांच्या निवासी इमारतींचा पुनर्विकास होणेबाबत**

**(२७) ११७७६५ (३१-०७-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी येथील डेअरीच्या कर्मचाऱ्यांच्या निवासी इमारतींची दुरवस्था झालेली असुन या इमारतीत वास्तव्य करणाऱ्या डेअरीच्या कर्मचाऱ्यांची व त्यांच्या कुटुंबियांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या इमारती जीर्ण झाल्या असल्याने त्यांची पुनर्बांधणी आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बी.डी.डी. चाळींच्या धर्तीवर तातडीने या डेअरीच्या निवासी इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (११-१०-२०१८) :** (१) होय.
(२) सदर इमारतींचे सरंचनात्मक परिक्षण सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे करण्यात आले आहे. सदर संरचनात्मक अहवालानुसार इमारतीस बऱ्याच प्रकारच्या हानी व क्षती झाली असून त्याचे प्रमाण पाहता सदर इमारती दुरुस्ती करणे आवश्यक आहे. हे खरे आहे.
(३) व (४) वरळी दुग्धशाळा कामागार वसाहतीत ४६ निवासस्थाने व दुग्धशाळा पर्यवेक्षकीय वसाहत वर्ग-३ ए टाईप ६८ निवासस्थाने असून ते सुमारे ५० वर्षे जुने आहेत. वरळी येथील खाऱ्या वातावणामुळे इमारतींची देखभाल दुरुस्ती करुनही इमारतींचे आयुष्यमान वाढत नाही. सदर वस्तूस्थिती लक्षात घेऊन धोकादायक इमारतींमधील निवासस्थानातील कर्मचाऱ्यांना अन्य इमारतीत रिक्त निवासस्थानाचे वाटप केले जात आहे.

---

**कोयना धरणातील प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडविण्याबाबत**

**(२८) ११७८७८ (०२-०८-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत),**

**श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयना धरणातील प्रकल्पग्रस्तांच्या पडीक जमिनी ऐवजी पर्यायी चांगली जमीन देणे, नोकरीत प्राधान्य देणे, पाणी व वीज पुरवठा करणे तसेच धरणाच्या परिसरातील गावामध्ये पर्यटनासाठी बोटींग सुरु करण्याची परवानगी देणे, पर्यावरण विकास आराखडा बनविणे, पायाभूत सुविधा देण्याबाबत दिनांक १९ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोयना धरण प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक कार्यवाही करुन प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडविण्यासाठी दिनांक २ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास मंत्रालयामध्ये मा.वनेमंत्री व वन विभागाच्या अधिका-यांच्या उपस्थितीत बैठक घेतली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोयना प्रकल्पग्रस्तांना देण्यात आलेली लेखी आश्वासने पूर्ण न झाल्याने सातारा, सांगली येथील २०७ गावांनी निवडणुकांवर बहिष्कार टाकण्यात येणार असल्याचे दिनांक ९ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास जाहीर केले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोयना प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-१०-२०१८) : (**१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) कोयना प्रकल्पग्रस्तांनी सातारा व सांगली जिल्हयातील निवडणुकीवर बहिष्कार टाकण्यात येणार असल्याचे निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(४) कोयना जलविद्युत प्रकल्पामुळे पाटण, जावळी व महाबळेश्वर तालुक्यातील एकूण ९८ गावे बाधीत झाली असून सदर गावामधील ९१७१ बाधीत प्रकल्पग्रस्त निश्चित करण्यात आले. त्यापैकी ९६८ बिगर खातेदार व ८२०३ पात्र खातेदारांपैकी ७०३० खातेदारांना जमीन वाटप झाली असून ११७३ खातेदारास जमीन वाटपाची प्रक्रिया चालू आहे.

कोयना प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडविण्याबाबत महसूल व वन विभागाच्या दि.०६.०३.२०१८ च्या शासन निर्णयाव्दारे मंत्रालयीन उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आलेली आहे.तसेच जिल्हाधिकारी सातारा यांचे अध्यक्षतेखाली विशेष कृती गट (TASK FORCE) स्थापन करण्यात आला आहे. तसेच उपविभागीय अधिकारी यांच्या अधिपत्याखालील निवाडयानुसार क पत्रक अद्यायावत करण्याबाबत ११ पथकामार्फत काम सुरू आहे.

कोयना प्रकल्पांतर्गत पाटण, जावळी व महाबळेश्वर तालुक्यातील एकूण ९८ गावातील एकूण ३९४ पैकी ३५५ उपलब्ध झालेल्या निवाडयातील डाटा एन्ट्री पूर्ण करण्यात आली आहे. ९८ गावांपैकी निवाडे उपलब्ध झालेल्या ६४ गावांची डाटा एन्ट्री पूर्ण झालेली आहे, तसेच ३४ गावांची सातबाराच्या आधारे डाटा एन्ट्री करण्याबाबतचे काम प्रगतीपथवार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे विभागातील भोर आगरामधील आवारात एटीएमची सुविधा सुरु करण्यासह जागेस मंजूरी देण्याबाबत**

**(२९) ११९०८३ (२३-०७-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे विभागातील भोर आगरात एटीएमची सुविधा सुरु करणे व त्यासाठी जागेस मंजूरी देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, राज्य मार्ग परिवहन महामंडळ, वाहतुक भवन, मुंबई यांना दिनांक ४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदने दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदर निवेदनानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०४-१०-२०१८) :** (१) होय.
(२) राज्य परिवहन महामंडळाच्या २८५ बसस्थानकांवर प्रवाशांना एटीएम सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता राज्य परिवहन महामंडळाद्वारे ई-निविदा प्रसारित करण्यात आलेली आहे. त्यामध्ये भोर आगाराचा समावेश आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई येथील मच्छिमारांना सोई सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३०) ११९४३० (३१-०७-२०१८). श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई परिसरात ऐरोली, दिवा, गोठवली, तळवली, घणसोली, वाशी, करावे व बेलापूर गावांमध्ये मच्छिमार व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालत असुन तेथे मासळी साठवणूक, वहातूक व मासळी सुकवण्याबाबतची व्यवस्था नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मच्छिमार व्यवसायासाठी जेट्टी परिसरात ओटले बांधणे, शीतगृहे, जाळे विणण्यासाठी शेड, होड्यांसाठी उतरता धक्का, प्रसाधनगृहे, सौरऊर्जा दिवे इत्यादी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. बंदरे मंत्री यांना माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मच्छिमारांच्या व्यवसायासाठी सोई सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२८-०९-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मौजे घणसोली, वाशी व दिवा येथील मासळी उतरविण्याच्या केंद्रावर मच्छिमारांना मुलभूत सुविधा पुरविण्याचे बांधकामे पूर्ण करण्यात आली आहेत. तसेच नाबार्ड अर्थसहाय्यीत योजने अंतर्गत दिवाळेगाव, बेलापूर येथील रु. १०.२० कोटी रकमेचे काम मंजूर असून या कामास दि. २३.०२.२०१७ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सदर कामास दि. ३१/०७/२०१८ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथे पाणीटंचाई सह चारा टंचाई निर्माण झाल्याने पशुधनाची हानी झाल्याबाबत**

**(३१) ११९७५२ (३१-०७-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथे झालेले कमी पर्जन्यमान, गारपीट यामुळे पाणीटंचाई, चारा टंचाई निर्माण झाल्याने पशुधन संकटात सापडले असल्याचे माहे मे २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाणी व चाऱ्याच्या टंचाईने शेतकऱ्यांनी गुरांची विक्री केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पशुधनासाठी पाणी व चाऱ्याची सुविधा तसेच पशुधन वाचविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२८-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
पांढरकवडा तालुक्यात सन २०१७ मध्ये जून ते सप्टेंबर या कालावधीत १०७.६ मि.मि. पर्जन्यमान झालेले असून त्याचे टक्केवारी ५२.१ एवढी आहे. यवतमाळ जिल्हयात २०१७ च्या रबी हंगामात सरासरीच्या एकूण १४० टक्के क्षेत्रामध्ये रबी पिकांची पेरणी झालेली आहे.
तालुक्यात सन २०१७-१८ या वर्षात विविध पिकांची लागवड, वने व इतर मार्गाने ८०,६११ मे.टन वाळलेला व हिरवा चारा उपलब्ध झालेला असून, सदर चा-यांची उपलब्धता ४०३ मे.टनने जास्त आहे.
(२) ही बाब निदर्शनास आलेली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्ह्यातील शेतकरी कंपन्यांचे बीजोत्पादन व वितरणाचे थकलेले अनुदान देण्याबाबत**

**(३२) ११९८८७ (३१-०७-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील शेतकरी कंपन्यांचे बीजोत्पादन व वितरणाचे थकलेले अनुदान देण्यास नकार दिल्याने नुकसान झालेल्या कंपन्यांच्या संचालकांनी दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास खामगाव येथे मा.कृषी मंत्री यांच्या निवासस्थानासमोर आत्मदहनाचा प्रयत्न केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार नुकसान झालेले शेतकरी कंपन्यांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-१०-२०१८) :** (१) शेतकरी उत्पादक कंपन्यांनी आंदोलन केले होते.

(२) शेतकरी उत्पादक कंपन्यांना अनुदान दिले असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुर्णानगर व आष्टी (ता.भातकुली, जि.अमरावती) येथे सोयाबीनच्या अत्यल्प उत्पादनाबाबत.**

**(३३) १२०२०४ (३१-०७-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुर्णानगर व आष्टी (ता.भातकुली, जि.अमरावती) येथे सोयाबीनचे अत्यल्प उत्पादन झाले असल्याचे दिनांक १५ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शेतकऱ्यांना पीक विमा योजनेचा लाभ न मिळाल्यामुळे त्यांनी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयात आंदोलन केले, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना पीक विमा योजनेचा लाभ मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांच्या पिक कापणी प्रयोगाच्या आधारे प्राप्त सरासरी उत्पन्न व उंबरठा उत्पन्न यांचे आधारे नुकसान भरपाई निश्चित केली जाते. भातकूली तालुक्यातील ११६८७ शेतकऱ्यांनी प्रस्तुत योजनेत सहभाग घेतलेला होता. त्यापैकी २७९० शेतकऱ्यांना योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार रु.६.५२ कोटी इतकी नुकसान भरपाई संबंधित विमा कंपनीमार्फत मंजूर करण्यात आलेली आहे. सोयाबीन पिकासाठी भातकुली तालुक्यातील ६०११ शेतकऱ्यांनी विमा संरक्षण घेतलेले होते. त्यापैकी २५१२ शेतकरी योजनेचे मार्गदर्शक सुचनेनुसार नुकसान भरपाईस पात्र ठरले असून त्यांना रुपये ६.३३ कोटी इतकी नुकसान भरपाई संबंधित विमा कंपनीमार्फत मंजूर करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) प्रादेशिक परिवहन विभागातर्फे नविन रिक्षांना परवाने देण्याबाबत

**(३४) १२०९२५ (०१-०८-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) प्रादेशिक परिवहन विभागातर्फे नविन रिक्षा परवाने वाटप करण्यात आले असून ११३६५ रिक्षांच्या अर्जापैकी १०९९४ रिक्षा चालकांना इरादा पत्र दिल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जुन्या रिक्षा थांब्यांवर रिक्षांची संख्या जास्त असल्यामुळे नविन रिक्षांच्या थांब्यांसाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे वाहतूक कोंडी होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पनवेल शहरातील वाहतूक कोंडीचा विचार करुन नविन रिक्षांना परवाने देताना कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०५-१०-२०१८) :** (१) व (२) पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयात ऑटोरिक्षा परवाना मिळण्यासाठी एकूण १२,२६३ अर्जदारांनी अर्ज केले होते. सदर अर्जाची दि.१८.०७.२०१७ च्या शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार पडताळणी करुन एकूण ११,७४६ अर्जदारांना प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल यांच्याव्दारा इरादापत्रे जारी करण्यात आलेले आहेत. ऑटोरिक्षा संघटना, लोकप्रतिनिधी, जनता यांनी केलेल्या रिक्षा स्टँडच्या मागणीनुसार वाहतुक पोलीस विभाग, ऑटोरिक्षा संघटनेचे प्रतिनिधी, प्रवासी संघटना व महानगरपालिका यांच्यासह स्टँडच्या जागेची पाहणी करुन सन २०१८ मध्ये ९९ रिक्षा स्टँडला मान्यता देण्यात आलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्रात बैलगाडा शर्यती सुरु करण्याबाबत

**(३५) १२११७२ (२३-०७-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ)** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात बैलगाडा शर्यतीचे विधेयक सन २०१७ मध्ये मंजूर झाले असतानाही बैलगाडा शर्यती सुरु झाल्या नाहीत मात्र तामिळनाडू व कर्नाटक येथे शर्यती सुरु झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विधेयक मंजूरी नंतरही राज्यात बैलगाडा शर्यती सुरु झाल्या नाही, हे ही खर आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार राज्यात बैलगाडा शर्यती सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (११-१०-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) राज्यात बैलगाडी शर्यतीस परवानगी देण्यासाठी, केंद्र शासनाच्या प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९६०, मध्ये "सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५" अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. सदर अधिनियम दिनांक ३१ जुलै, २०१७ रोजी राज्य शासनाच्या राजपत्रात प्रख्यापित करण्यात आला असून, सदर अधिनियम दिनांक १०.८.२०१७ पासून अंमलात आणण्यात आला आहे. तथापि, उक्त अधिनियमातील तरतूदींविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका (स्टॅम्प क्र. २३१३२/२०१७) दाखल करण्यात आली होती. सदर जनहित याचिकेच्या अनुषंगाने दिनांक ११.१०.२०१७ रोजी मा.उच्च न्यायालयाने अंतरीम आदेश दिले आहेत. त्यामध्ये भारतीय जिव जंतु कल्याण मंडळ विरुध्द ए.नागराजा व इतर याप्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामध्ये केलेल्या निरिक्षणाचा दाखला देऊन राज्यात बैलगाडी शर्यतीच्या आयोजनास परवानगी देता येणार नाही असे आदेश दिलेले आहेत.सदर आदेशामध्ये मा.उच्च न्यायालयाने असेही स्पष्ट केले आहे की, बैलगाडी शर्यतीच्या आयोजना संदर्भात राज्य शासनाने जरी नियम प्रसिध्द केले तरी, त्यानुसार राज्यात बैलगाडी शर्यतीस परवानगी देता येणार नाही.

मा.उच्च न्यायालयाने दिनांक ११.१०.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आली आहे. सदर प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कळंब (जि.उस्मानाबाद) तालुक्यामध्ये नविन पशुवैद्यकिय दवाखाने सुरु करण्याबाबत

**(३६) १२१६६८ (३१-०७-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे-मोहा, मौजे-मस्सा व मौजे रांजणी (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथे पशुवैद्यकिय दवाखाना सुरु करण्याबाबतची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ एप्रिल,२०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्रव्यवहार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, उस्मानाबाद हा अवर्षणप्रवण क्षेत्रातील, आर्थिकदृष्ट्या मागासलेला जिल्हा असून तेथील ७० टक्के पेक्षाही जास्त नागरिक उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांस सततच्या दुष्काळामुळे शेतीपासून कमी उत्पन्न मिळत असल्याने शेतीस जोडधंदा म्हणून पशुपालन हा शेतीपूरक व्यवसाय करत असुन शेतकऱ्यांची व पशुधनांची संख्या पाहता पशुवैद्यकिय दवाखान्याची कमतरता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर ठिकाणी पशुवैद्यकिय दवाखाना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२८-०९-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) १९ व्या पशुगणनेनुसार उस्मानाबाद जिल्ह्यात ५,५४,३३७ पशुधन घटक असून, बिगर डोंगरी भागात ५,००० पशुधन घटकामागे एक पशुवैद्यकीय दवाखाना या प्रमाणे जिल्हयात ११० पशुवैद्यकीय दवाखान्यांची आवश्यकता असून, जिल्हयात सद्यस्थितीत १०१ पशुवैद्यकीय दवाखाने कार्यरत असून, १० पशुवैद्यकीय दवाखान्यांचा अनुशेष आहे.
(४) आयुक्त पशुसंवर्धन यांचेकडून पत्र दि.०८.०७.२०११ अन्वये उस्मानाबाद जिल्ह्यातील एकूण १४ नवीन पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या स्थापनेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला होता. त्यामध्ये मौजे रांजणी, ता. कळंब चा ही समावेश होता. सदर व अन्य जिल्हयातील प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने नवीन पद निर्मितीस सहमती प्रदान करण्याची विनंती सन २०१२ मध्ये वित्त विभागास केली असता, राज्याची वाढती महसूली तूट, राज्याच्या तिजोरीवरील ताण तसेच, आस्थापना खर्च मर्यादित ठेवण्याची निकड लक्षात घेता, सद्यस्थितीत विभागाचा प्रस्ताव मान्य करणे शक्य नाही. किंबहूना आर्थिक भाराच्या वाढीचे प्रस्ताव विभागाने वित्त विभागास सादर करु नयेत, असे अभिप्राय दिलेले असल्याने, सदर १४ नवीन पशुवैद्यकीय दवाखान्यांची स्थापना झालेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अकोला, उदगीर ,नागपूर तसेच मिरज येथील शासकिय दूध योजना केंद्रे बंद असल्याबाबत

**(३७) १२२०४३ (३१-०७-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला, उदगीर ,नागपूर तसेच मिरज येथील शासकिय दूध योजना केंद्रे बंद असल्याचे माहे एप्रिल,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दूध योजना केंद्रे बंद असल्याने मराठवाडयातील सुमारे ८० हजार लिटर दूध दररोज कोल्हापूर व सांगली जिल्हयात दूध पावडर व बटर तयार करण्यासाठी पाठविले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार शासकीय दूध केंद्रे तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (११-१०-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) शासनाचे वरील चारीही दूध भुकटी प्रकल्प ३० वर्षापूर्वी कार्यान्वीत झालेले आहेत. सद्यस्थितीत मशिनरी व इमारती जुन्या झालेल्या असून सद्यस्थितीत त्यांची दुरुस्ती करणे शक्य होत नाही. सदर दूध भुकटी प्रकल्पांसारखेच काही ठिकाणच्या शासकीय दूध योजना बंद स्थितीत वा बंद पडण्याच्या स्थितीत आहे. अशा बंद पडलेल्या व बंद पडण्याची शक्यता असलेल्या दूध योजनांचे/प्रकल्पांचे पीपीपी तत्वावर पुनरुज्जीवन करण्यासाठी शासनाने तांत्रीक सल्लागाराची नियुक्ती करण्यास मान्यता दिलेली असून तांत्रिक सल्लागार नियुक्तीची कार्यवाही सुरु आहे. तांत्रिक सल्लागाराचा अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भुम (जि.उस्मानाबाद) तालुक्यामध्ये शासकीय दुध योजना सुरु करण्याबाबत**

**(३८) १२२२६१ (२५-०७-२०१८). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुम (जि.उस्मानाबाद) तालुक्यामध्ये ४ लक्ष लीटरचे दुध उत्पादन होत असुन दुध संकलनासाठी एकच शासकीय दुध योजना सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील भुम शासकीय दुध योजना केंद्राची क्षमता कमी पडत असुन सदर योजनेला ठराविक लीटर दुध संकलन करण्याचे बंधन शासनाचे असल्यामुळे शेतकऱ्यांना खाजगी संघाकडे दुध द्यावे लागत असुन खाजगी दुध संघमालक दुधाला त्यांच्या मनाप्रमाणे दर देत असल्यामुळे दुध उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भुम तालुक्यामध्ये दुध संकलनासाठी शासकीय दुध योजना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (३१-१०-२०१८) :** (१) भुम तालुक्यामध्ये दैनंदीन शासनाचे ०.०७ लक्ष व खाजगी प्रकल्पामार्फत प्रतिदीन १.३७ लक्ष ली. दूध संकलन होत आहे. असंघटीत क्षेत्राच्या दुध संकलनाची माहीती शासनाचकडे उपलब्ध नाही.

(२) व (३) भुम तालुक्यात खवा उत्पादन क्लस्टरची निर्मिती झालेली आहे तसेच असंघटीत क्षेत्रामार्फत फार मोठया प्रमाणावर दूध खवा उत्पादनासाठी वापरले जाते.

जानेवारी २०१७ व त्यापुर्वी खाजगी प्रकल्पधारकांकडुन दुधाचे खरेदी दर जास्त मिळत असल्यामूळे जिल्हातील दूध उत्पादकांनी शासकीय दूध योजना, भुम येथे दूध पुरवठा बंद केलेला होता. त्यामुळे जानेवारी २०१७ ते ऑगस्ट २०१७ पर्यत शासकीय दुध योजना, भुम कार्यरत नव्हती तथापी शासन निर्णय दि. १९/०६/२०१७ अन्वये दूध खरेदी दरात वाढ केली असून खरेदी दर रू. २७/-केलेले होते. त्यामूळे दुध उत्पादक व दूध दत्पादक संस्थांनी थेट पुरवठाव्दारे दुध स्विकृती करण्याची शासनाकडे विनंती केलेली असल्यामुळे दूध उत्पादकांच्या हितासाठी सदर बंद असलेली शासकीय दूध योजना ऑगस्ट २०१७ पासून पुन्हा कार्यावित करण्यात आलेली आहे. दूध उत्पादकांचे व प्राथमिक दूध संस्थाचे दूध शासन निर्णय दि. २६/०८/२०१० अन्वये स्विकृत करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हयात खतांच्या दरात करण्यात आलेली दरवाढ**

**(३९) १२२२६८ (३१-०७-२०१८). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयात युरिया वगळता अन्य खतांच्या दरात ८० ते १२५ रुपयांपर्यंत करण्यात आलेल्या दरवाढीच्या विरोधात स्वाभामानी शेतकरी संघटनेने उस्मानाबाद, तुळजापूर व कळंब येथील महसुल कार्यालयासमोर आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्वाभामानी शेतकरी संघटनेच्या मागण्या मान्य करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-१०-२०१८) :** (१) होय.

(२) केंद्र शासनाने दिनांक १ एप्रिल २०१० पासून खत अनुदान योजनेत बदल करुन मुलद्रव्याधारित अनुदान योजना (एनबीएस) राबविण्यास सुरुवात केलेली आहे. या योजनेतंर्गत रासायनिक खतावरील अनुदान केंद्र शासनाकडून ठरविण्यात येते. परंतु, खत विक्री किंमती ठरविण्यास संबंधित खत उत्पादक कंपन्यांना अधिकार दिलेले आहेत. त्यामुळे, केंद्र शासनाकडून मुलद्रव्याधारित अनुदान योजना (एनबीएस) या धोरणात खतांचे अनुदानाचे दर वर्षभरासाठी निश्चित करण्यात येवून सुध्दा, खत उत्पादक कंपन्या, आंतरराष्ट्रीय बाजारातील खतांचे बाजारभाव व कच्च्या मालाच्या किंमती व रुपयांचा विनिमय दर या आधारे कंपन्या विक्रि किंमत निश्चित करतात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अचलपूर (जि.अमरावती) तालुक्यातील पशुसंवर्धन विभागाचे शेतकरी प्रशिक्षण निर्मिती प्रस्तावास निधी देण्याबाबत

**(४०) १२२३६७ (३१-०७-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर (जि.अमरावती) तालुक्यातील पशुसंवर्धन विभागाचे शेतकरी प्रशिक्षण निर्मिती प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करून रु. १.३५ कोटी निधी उपलब्ध करून देणेबाबत वि.स.स. अचलपूर यांनी लेखी निवेदनाद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अचलपूर तालुक्यातील पशुसंवर्धन विभागाचे शेतकरी प्रशिक्षण निर्मिती प्रस्तावास निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२८-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) प्रस्तावित शेतकरी प्रशिक्षण केंद्रासाठी विविध संवर्गातील / समकक्ष ०७ नवीन पदांची आवश्यकता असून, वित्त विभाग शासन निर्णय दि.२.०६.२०१५ अन्वये नवीन पदनिर्मितीवर निर्बंध घालण्यात आलेले आहेत. करिता, या प्रस्तावास शासनाची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली नाही.

सद्यस्थितीत राज्यात महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास मंडळ अधिनस्त प्रक्षेत्रे, अंडी उबवणूक केंद्रे, सधन कुक्कुट विकास गट, केंद्र पुरस्कृत ॲस्कॅड योजना, रोजगार व स्वयंरोजगार कार्यक्रम आणि जिल्हास्तरीय कामधेनू दत्तक ग्राम योजनेअंतर्गत शेतकरी प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजापूर पंचायत समितीच्या पशुवैद्यकिय दवाखान्यात वैद्यकिय अधिकारी नसल्याबाबत

**(४१) १२३३९० (३१-०७-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) पंचायत समितीच्या पशुवैद्यकिय दवाखान्यात वैद्यकिय अधिकारी नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या जनावरांचे हाल झाल्याचे माहे मे,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जनावरांवर उपचार व लसीकरणासाठी राजापूर तालुका पंचायत समितीच्या पशुवैद्यकिय दवाखान्यात शेतकरी येत असून तेथे डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे जनावरांना औषधे वेळेवर न मिळाल्यामुळे दोन म्हशीचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राजापूर तालुका पंचायत समितीच्या पशुवैद्यकिय दवाखान्यात वैद्यकिय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२७-०९-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

पशुधन विकास अधिकारी,पवैद श्रेणी-१,ता.राजापूर, जि.रत्नागिरी हे पद रिक्त असून सदर रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या सहाय्यक पशुधन विकास अधिकारी यांचे कडे सोपवून पशुपालकांचे जनावरांना नियमित सेवा पूरविण्यात येत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जनावरांचे हाल झाल्याचे माहे मे २०१८ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आलेले नाही. तसेच औषधे वेळेवर न मिळाल्यामुळे दोन म्हशींचा मृत्यु झाल्याची बाब निदर्शनास आलेले नाही.

रत्नागिरी जिल्हयातील राजापूर तालूक्यात पशुधन विकास अधिकारी यांची एकूण ४ पदे मंजूर असुन सध्या स्थितीत चारही पदे रिक्त आहेत. तसेच सहाय्यक पशुधन विकास अधिकारी याचे एक पद मंजूर असून ते भरलेले आहे. पशुधन पर्यवेक्षकांची १६ पदे मंजूर असून त्यापैकी १२ पदे भरलेली आहेत व ४ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुवैदयकीय अधिकाऱ्यांकडे सोपवून त्यांचेव्दारे पशुपालकांच्या जनावरांना नियमित सेवा पूरविण्यात येत आहेत.

पशुधन विकास अधिकारी गट-अ या संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविण्यात आले आहे. तसेच सहाय्यक पशुधन विकास अधिकारी ते पशुधन विकास अधिकारी गट-ब या संवर्गातील पदोन्नतीबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरु असून सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर राजापूर तालूक्यातील रिक्त पदे भरण्याबाबत विचार करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यात एसटी आगारातील कर्मचाऱ्यांच्या नादुरुस्त गाड्यांबाबत

**(४२) १२३४८९ (२४-०७-२०१८). श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यात एसटी आगारातील कर्मचाऱ्यांच्या नादुरुस्त गाड्यांच्या तक्रारीची दखल वरिष्ठ अधिकारी घेत नसल्यामुळे कर्मचाऱ्यांनी आंदोलन केल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आगारामध्ये काही महिन्यांपासून गाड्या नादुरुस्तीचे प्रमाण वाढत असून रस्त्यावरच गाड्या बंद पडत असल्यामुळे प्रवासी, चालक व वाहक यांना त्रास सहन करावा लागतो, तसेच गाड्या दुरुस्त करण्यासाठी आवश्यक साधनसामुग्री दापोलीमध्ये उपलब्ध करुन देण्याबाबत वरिष्ठ कार्यालयाकडे मागणी केली असता त्याकडे प्रशासन दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यात एसटी आगारातील कर्मचाऱ्यांच्या नादुरुस्त गाड्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०४-१०-२०१८) :** (१) होय.

दापोली आगारातील मान्यताप्राप्त संघटनेने दि.०२.०५.२०१८ रोजी आगार व्यवस्थापक, दापोली आगार यांना बेमुदत उपोषणाची नोटीस दिलेली होती. परंतू, प्रशासनाने संबंधितांबरोबर वेळीच सकारात्मक चर्चा करुन प्रश्न निकाली काढला आहे.
(२) नाही.

दापोली आगारातील नादुरुस्त, मार्गबंद वाहनांचे प्रमाण गतवर्षीपेक्षा कमी आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीक्षेत्र रेवसा (ता.जि.अमरावती) येथे पशुप्रदर्शनी व शेतकरी मेळावाकरिता निधी मंजूर करणेबाबत**

**(४३) १२३५०१ (३१-०७-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीक्षेत्र रेवसा (ता.जि.अमरावती) येथे जिल्हा वार्षिक योजना सन २०१७-१८ अंतर्गत पशुप्रदर्शनी व शेतकरी मेळाव्यांना निधी मंजूर करण्यासाठी जिल्हा पशुसवंर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास पत्र दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन श्रीक्षेत्र रेवसा येथील पशुप्रदर्शनी व शेतकरी मेळाव्यांना निधी मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२८-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी दि.१२.०६.२०१८ च्या पत्रान्वये श्रीक्षेत्र रेवसा येथील पशुप्रदर्शनी व शेतकरी मेळाव्यासाठी जिल्हाधिकारी तथा, सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, अमरावती यांचेकडे रु.५.०० लक्ष निधीची मागणी केलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळकोट (जि. लातूर) तालुक्यात एस.टी. महामंडळाचे स्वतंत्र बस आगार स्थापन करण्याबाबत

**(४४) १२३६५१ (०१-०८-२०१८). डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर)** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळकोट (जि.लातूर) तालुक्यात एस.टी. महामंडळाचे स्वतंत्र बस आगार स्थापन करण्याबाबत मा.राज्यमंत्री महोदयांच्या दालनात माहे मे २०१८ मध्ये वा त्यासुमारास बैठक आयोजित करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी स्वतंत्र आगार स्थापन करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन एस.टी. महामंडळाचे स्वतंत्र बस आगार स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०४-१०-२०१८) :** (१) व (२) होय.

(३) राज्य परिवहन महामंडळाच्या आगार निमिर्तीबाबतच्या धोरणानुसार ३० कि.मी परिसरात जवळच्या आगाराची नियते १०० पेक्षा अधिक असल्याशिवाय नव्याने आगार निमिर्ती करु नये, त्यामुळे जळकोट येथे आगार निमिर्ती करणे महामंडळाच्या धोरणाशी सुसंगत नाही.

तथापि, बसस्थानकाच्या आधुनिकीकरण/ पुनर्बांधणीच्या कामास्तव बसस्थानकाचे आराखडे तयार करण्यासाठी वास्तुविशारद यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्हयातील खरीप पिक विम्याच्या ६४ हजार शेतकऱ्यांना विमा भरपाईतून वगळण्याबाबत

**(४५) १२३९२८ (३१-०७-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयात अपुऱ्या पावसाअभावी हंगाम उध्वस्त झाला असून आणेवारी ४६ पैसे असतांना कृषी विभागाच्या पीक कापणी प्रयोगांनी उत्पन्न जास्त दाखवल्याने ६४,२१९ शेतकऱ्यांना विमा भरपाईतून वगळण्यात आल्याचे दिनांक ६ जुन २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले असुन पीकविमातुन वगळण्यात आलेल्या शेतकऱ्यांना पीक विमा मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-१०-२०१८) :** (१), (२) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार योजने अतंर्गत निश्चित करण्यात येणारी नुकसान भरपाई अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांच्या पिक कापणी प्रयोगाच्या आधारे प्राप्त सरासरी उत्पन्न व उंबरठा उत्पन्न यांचे आधारे निश्चित केले जाते. अधिसूचित पिकाचे अधिसूचित क्षेत्रातील सरासरी उत्पन्न् उंबरठा उत्पान्नापेक्षा ज्या प्रमाणात कमी असेल त्या प्रमाणात नुकसान भरपाई विमा कंपनी मार्फत अदा केली जाते. योजनेंतर्गत नुकसान भरपाई निश्चित करतांना पैसेवारी, दुष्काळ, टंचाई परिस्थिती आणि पुरामुळे झालेल्या नुकसानी संदर्भात कोणताही शासकीय विभाग/संस्थेमार्फत घोषीत करण्यात आलेली आकडेवारी ग्राहय धरण्यात येत नाही.

खरीप हंगाम २०१७ मध्ये अमरावती जिल्हयातील १.१० लाख शेतकऱ्यांनी योजनेत सहभाग घेतला होता. त्यापैकी विमा कंपन्यामार्फत प्राप्त अंतरिम अहवालानुसार ०.४५ लाख शेतकऱ्यांना रुपये ६३.४८ कोटी नुकसान भरपाई विमा कंपन्या मार्फत अदा करण्यात आलेली आहे.

योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार योजनेत सहभागी शेतकऱ्यांपैकी जे शेतकरी नुकसान भरपाईस पात्र ठरले आहेत, अशा शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आलेली आहे

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चाळीसगांव (जि.जळगांव) येथील दूध संघाच्या संचालक मंडळाने शासकीय जमीन इमारत व डेरी प्लान्ट सुरु करण्याबाबत

**(४६) १२४५३६ (३१-०७-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगांव (जि.जळगांव) येथील दूध संघाच्या संचालक मंडळाने शासकीय जमीन इमारत व डेरी प्लान्ट सुरु करण्यासाठी दुग्ध संघाचे अध्यक्ष यांनी दिनांक २३ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, नाशिक यांच्याकडे पाठविलेला प्रस्ताव दुग्ध व्यवसाय विभागामार्फत महसूल विभागास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत तेथील लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री यांच्याकडे दिनांक १४ ऑक्टोंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे विनंती केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चाळीसगांव (जि.जळगांव) येथे डेरी प्लान्ट सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (११-१०-२०१८) :** (१) होय

(२) असे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही.

(३) शासनाने दि.२८ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार दुग्धविकास विभागांतर्गत बंद पडलेल्या व बंद पडण्याची शक्यता असलेल्या शासकीय दूध योजना व शितकरण केंद्र खाजगी-सार्वजनिक सहभाग तत्वावर पुनर्जिवीत करण्याबाबत निर्णय घेतला असून त्यासाठी तांत्रिक सल्लागार नियुक्त करण्यास मान्यता दिली आहे. सदर तांत्रिक सल्लागाराकडून प्राप्त होणाऱ्या अहवालानुसार पुढील कार्यवाही केली जाणार आहे. त्यानुसार प्रश्नाधीन डेरी प्लांट बाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाशिम जिल्हयात गटशेती प्रकल्पाअंतर्गत सर्व उपक्रम ठप्प झाल्याबाबत.**

**(४७) १२४५४७ (३१-०७-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयासह राज्यभरातील जिल्हयांमध्ये तालुकानिहाय २० शेतकरी गटांच्या माध्यमातून किमान १०० एकर क्षेत्रावर विविध स्वरुपात कृषी व कृषीपूरक उपक्रम राबविण्यात आले परंतु यावर्षी सर्वच जलस्त्रोत कोरडे पडल्याने समूह गटशेती प्रकल्पाअंतर्गत सर्व उपक्रम बंद झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनस्तरावरुन काय कार्यवाही वा उपाययोजना करण्यात आली वा येत आहे ?
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही, गट शेतीस प्रोत्साहन व सबलीकरणासाठी शेतकऱ्यांच्या गट शेतीस चालना देणे या योजनेअंतर्गत राज्यामध्ये सन २०१७-१८ या वर्षासाठी जिल्हास्तरीय समितीच्या शिफारशीनुसार एकूण १९० गटांच्या निवडीस कृषि आयुक्तालयाकडून मान्यता देण्यात आली आहे. सदरच्या गट निवडीस मान्यता दिलेल्या १९० शेतकरी गट/उत्पादक कंपन्यांपैकी एकूण ११८ गटांच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) जिल्हास्तरीय समितीने अंतिम मान्यता दिल्यानुसार प्रकल्पातील घटकांची / उपक्रमांची कामे राज्यात सुरु आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उदगीर (जि.लातूर) तालुक्यातील दुध भुकटी प्रकल्प सुरु करण्याबाबत**

**(४८) १२४७६४ (३१-०७-२०१८). डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) तालुक्यातील दुध भुकटी प्रकल्प काही वर्षापुर्वी बंद अवस्थेत असल्याने दुधाची पंढरी म्हणून ओळखला जाणाऱ्या उदगीर तालुक्याची ओळख नष्ट झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुध भुकटी प्रकल्पाच्या माध्यमातून हजारो तरुणांना रोजगार मिळत होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रकल्प पुर्नजिवित करुन प्रकल्प सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (११-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) सदर प्रकल्पामुळे पुर्वी तरुणांना रोजगार मिळत होता हे खरे आहे. सन २०१५ मध्ये काही तांत्रिक कारणामुळे सदर प्रकल्प बंद करण्यात आला होता. त्यामुळे सदर प्रकल्पातील अतिरिक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांना दुसऱ्या योजनेत सामावून घेण्यात आले आहे.

बंद पडलेल्या व बंद पडण्याची शक्यता असलेल्या दूध योजनांचे पीपीपी तत्वावर पुनरुज्जीवन करण्यासाठी शासनाने तांत्रीक सल्लागाराची नियुक्ती करण्यास मान्यता दिली असून तांत्रिक सल्लागाराकडुन प्राप्त होणाऱ्या अहवालानुसार पुर्नजिवन करण्याबाबतचा योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खेड तालुक्यातील जनावरांना लाळ्या खुरकत लस वेळेत न दिल्यामुळे जनावरांचा झालेला मृत्यू

**(४९) १२४९६६ (०३-०८-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड तालुक्यात जनावरांना रोगापासून वाचविण्यासाठी वर्षातून २ वेळा म्हणजे माहे, सप्टेंबर आणि मार्च मध्ये लाळ्या खुरकत या आजाराचे लसीकरण वेळेत न करण्यात आल्यामुळे ८ जनावरांचा मृत्यू झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार लाळ्या खुरकत रोगाचा संसर्ग रोखण्यासह लस उपलब्ध करण्याबाबत तसेच लाळ्या खुरकत रोगाने दगावलेल्या जनावरांच्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२८-०९-२०१८) :** (१) लाळ खुरकुत रोग प्रतिबंध लसीकरण गाय व म्हैस वर्गास वर्षातून २ वेळा ६ महिन्यांच्या अंतराने करण्यात येते. सन २०१७-२०१८ मध्ये निविदा प्रक्रियेतील तांत्रिक अडचणींमुळे जुलै-ऑगस्ट मधील फेरीचे लसीकरण दि.८.०३.२०१८ ते दि. २१.०४.२०१८ या कालावधीत करण्यात आलेले आहे. तथापि, एप्रिल, २०१८ वा त्या दरम्यान लाळ खुरकुत रोग प्रादुर्भावामुळे जनावरे दगावल्याची कोणतीही घटना विभागाच्या निदर्शनास आलेली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल एस.टी आगारात पाकिटमार, भुरट्या चोरांची तसेच मद्यपी आणि गर्दुल्ल्यांची दिवसेंदिवस संख्या वाढत असल्याबाबत**

**(५०) १२५०७८ (३१-०७-२०१८). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल एस.टी आगारात पाकिटमार,भुरट्या चोरांची तसेच मद्यपी आणि गर्दुल्ल्यांची दिवसेंदिवस संख्या वाढत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. दिवाकर रावते (०४-१०-२०१८) :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.